Review Of Research
Vol. 3, Issue. 1, Oct. 2013 Available online at www. lbp.world
**ISSN:-2249-894X**

# “जागतिकीकरण आणि भारतीय स्त्री’’

**प्रा. कदम संभाजी धोंडीराम**
बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी, ता.पलूस, जि.सांगली.

**प्रस्तावना:**

मानवाच्या निर्मितीपासून स्त्री ही त्याची सोबतीन आहे. आदिम काळात मानव जेंव्हा गुहेत रहात होता.तेव्हा अन्नाच्या शोधासाठी पुरूष गुहेबाहेर,जंगलात फळे,शिकार करण्यास जात होता. त्यावेळी गुहेत असणारी स्त्री गुहेच्या भोवतालची झाडी व गवत काढून जागा स्वच्छ करत होती .अन्न म्हणून आणलेल्या फळांच्या बीया ह्या रिकाम्या जागेत टाकल्या. त्या बीयांपासून रोपे तयार झाली त्या रोपापासून झाडे तयार झाली. ही प्रक्रिया प्रथम स्त्रीच्या लक्षात आली. पुढे हे काम कष्टाचे म्हणून पुरूषांकडे गेले. पण शेतीचा शोध स्त्रीने लावला आहे. जिच्यापासून शेतीचा शोध लागला आणि अखिल मानवजात निर्माण झाली त्या स्त्रीची किंमत आजही समाजाला कळालेली नाही.

जागतिकीकरण म्हणजे खुली अर्थव्यवस्था,मुक्तव्यापार, जागतिक पातळीवर अर्थव्यवस्था अधिक एकात्म होत चालली आहे. देशांच्या सीमारेषा पार करून भांडवल प्रवाहीपणे इकडून तिकडे जात आहे. व्यापाराची कक्षा रूंदावली आहे. त्यामुळे वस्तू आणि सेवा ह्यांची देवाण घेवाण,संपर्काची सुलभता आणि श्रमाचा विनिमय ह्यामध्ये गतीशीलता आली आहे. सुरूवातीला ही प्रक्रिया प्रगतशील,कनवाळू स्वरूपाची आहे. म्हणून विकसनशील देशांनी आपली अंतर्गत अर्थव्यवस्था मुक्त करण्याचे धोरण आखले जागतिक भांडवलशाहीमध्ये मिसळून जावे म्हणजे विकसनशील जगातील सर्वसामान्य माणसांचे जीवन उंचावेल अशी आशा मनात होती.मात्र हया सर्वात भरडून निघाली ती स्त्रीच होय.जागतिक अर्थव्यवस्थेचा “एक अविभाज्य भाग या दृष्टीने देशाच्या अर्थव्यवस्थेचा विकास म्हणजे जागतिकीकरण होय’’ बाहेरच्या जगाशी कमीत कमी संबंध ठेवून स्वबळावर विकास साधणे देशाच्या आयातीला पर्याय शोधणे, माल, सेवा,भांडवल,यांच्या मुक्त आयात निर्यातीव्दारे इतर देशांशी संपर्क ठेवून आपला विस्तार करणे.

जागतिकीकरणामुळे भारतासारख्या देशात बहुसंख्य गरीब, निरक्षर, अकुशल आणि कमकुवत गटामध्ये असलेल्या स्त्रियांवर विपरीत परिणाम झाला आहे. जागतिकीकरणाची सर्व धोरणे पुरूष प्रधान व्यवस्था व श्रेणी रचना कायम करण्यासाठी मदत करत असल्याने ती स्त्रियांच्या विरोधात आहेत. समाजातील कमजोर, दुबळे घटक याचे बळी ठरले आहेत. स्त्रियांही त्यातीलच एक आहेत. त्यांना अन्न, पाणी, निवारा, रोजगार, वस्त्र, शिक्षण, आरोग्य अशा सर्व जीवनावश्यक वस्तूसांठी झगडावे लागत आहे. जागतिकीकरणामुळे झपाटयाने खाजगीकरण होवू लागले त्या खाजगीकरणाचा फटका कामगार वर्गाला बसला. नवीन निर्यात क्षेत्रे ठरली गेली. त्यात कामगार,कायदे, मानवी हक्कांची पायमल्ली झाली. सरकारने गरीबांचा विकास करण्याऐवजी भांडवलदार व खाजगी उद्योगांना प्रोत्साहन

दिले. त्यामुळे रोजगाराची असुरक्षितता, अतिप्रगत तंत्रज्ञानाचा वापर, शिक्षणाच्या संधी कमी झाल्या, शेती क्षेत्रावर दडपण वाढले, अनेक छोटे उद्योग, माठे स्थानिक उद्योग बंद पडले. वाढती बेकारी, वाढता देह विक्रय व्यवसाय, स्त्रियांवरील वाढती हिंसा, सेक्स टुरिझम, शेतकरी, कामगारांच्या आत्महत्या यांचा परिणम स्त्री जीवनावर झाला.

जागतिकीकरणामुळे व खाजगीकरणामुळे ऐच्छिक निवृती योजना कामगार, कपात, सार्वजनिक व खाजगी क्षेत्रामध्ये स्त्रियांची होणारी पिछेहाट,यांत्रिकीकरणामुळे पारंपरिक स्त्री व्यवसाय बुडाले, रेशमाची आयात वाढल्याने स्थनिक रेशीम उद्योगाला घरघर लागली. मासेमारी, सहकारी व कुटीरोद्योगावर घरगुती उद्योगावर संक्रांत आली. या सर्वाला मोठ्या प्रमाणात स्त्रिया बळी पडत आहेत. अर्थव्यवस्थेची पुर्नरचना या धोरणाचा परिणाम म्हणून शिक्षण व आरोग्य क्षेत्रांचे खाजगीकरण, व्यापारीकरण, घडून आले.शासनाची कल्याणकारी राज्याची संकल्पना, बाजारी शक्तीच्या प्रभावाखाली अदृष्य होत आहे. त्याचा परिणाम स्त्रियांच्या शिक्षण, रोजगार व आरोग्यावर होत आहे.

- **स्त्रिया व अर्थव्यवस्था :**

भारतात १९९१ नंतर आर्थिक क्षेत्रात ज्या नव्या रचनात्मक सुधारणा वा बदल झाले. त्यांचा परिणाम स्त्रियांवर झाला. स्थिरीकरण, रचनात्मक बदल, उदारीकरण, आर्थिक सुधारणा, ह्या जागतिकीकरणाच्या घटकांचा परिणाम स्त्री जीवनावर झाला. शासकीय लूट, रूपयाचे अवमूल्यांकन, वस्तूंच्या किंमतीचे नियमन व नियंत्रण राहिले नाही. सवलती काढून घेतल्या गेल्या. अशा आर्थिक धोरणामुळे स्त्री जीवनावर परिणाम होवून अन्नधान्य, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, बाळंतपण, अपत्य संगोपण ह्यासाठी लागणारा पैसा उपलब्ध होत नाही. मुलभूत गरजांच्या पूर्ततेची जबाबदारी सरकार जेंव्हा बाजार पेठेवर सोपवते तेव्हा त्याचे विपरीत परिणाम स्त्रीयांना भेगावे लागतात. नोकर, मोलकरीण, शेतमजूर, कामगार, व्यापारी इ. क्षेत्रातील स्त्रिया घरातील कुटुंबाला हातभार लावतात. घरकाम करून पूर्णवेळ, अर्धवेळ, पूर्ण पगारी, अर्धपगारी, रोजंदारीवर काम करून स्त्रिया पैसा मिळवण्याचा प्रयत्न करतात. नडलेल्या स्त्रीया मिळेल त्या पगारावर काम करतात. थायलंडमध्ये अनेक कामगार स्त्रीयांना कामावरून काढून टाकल्याने त्यांच्या कुटुंबाची अर्थव्यवस्था कोलमडून पडली आहे. ग्रामीण भागापासून शहरापर्यंत छोटे मोठे व्यवसाय करणाऱ्या स्त्रीयांचे व्यवसाय जागतिकीकरणामुळे बुडाले. पारंपरिक वस्तूंना शह बसला. आणि आधुनिक वस्तू स्वस्त दरात बाजारात आल्या त्याचा फटका स्त्रीयांना बसला. पारंपरिक पद्धतीने धुणी धुणारी ग्रामीण भागातील परटीन बाजारात आलेल्या नविन वॉशिंग मशिनमुळे बेरोजगार झाली.

जागतिकीकरणचा स्त्रियांवर चांगला परिणाम झाला किंवा नाही याचा शोध घेताना असे म्हणावे लागते की, जागतिकीकरणाचा दुसरा अर्थ खाजगीकरण यामुळे नवीन हुकूमशाही उदयास येत आाहे. आणि हुकूमशाही व्यवस्थेमध्ये आजपर्यंत स्त्रियांना नगन्य स्थान मिळाले आहे. याचा पुरावा भारतीय इतिहास आहे. या जागतिकीकरणात स्त्रीचा दर्जा खालील मुद्दयांना अनुसरून पहाता येईल.

- **विश्वसुंदरी :**

जागतिक पातळीवर दिला जाणारा विश्वसुंदरी हा किताब भारतीय सुंदरीना देण्याामागे परकीय देशांची भावना अशी की, भारतीय लोकांचा सकारात्मक दृष्टीकोन होवून भारतीय बाजारपेठेमध्ये आपले स्थान निश्चित करण्यासाठी परकीय देशानी भारतीय स्त्रियांना विश्वसुंदरी हा किताब दिला. खरे तर विश्वसुंदरी सारख्या स्पर्धा उच्चभ्रू लोकांसाठी आयोजित केलेल्या, पण भारतीयांना यातील डावपेच कळाले नाहीत. विश्वसुंदरीचा किताब देवून भारतीयांना खूश करायचे आणि व्यापाराला बाजारपेठ मिळवायची हा मूळ हेतू मनात ठेवून या स्पर्धा आयोजित केल्या जातात स्त्रीयांना महत्व नसते.

- **वेश्या व्यवसाय :**

वेश्या व्यवसाय व्यापाराच्या मुक्त धोरणामुळे अनेक गोष्टींना स्वातंत्र्य मिळाले. पर्यटन व्यवसायाला नवे दिवस आले,परकीय उद्योगधंदे, व्यापार यानिमित्ताने अनेक दिवस घराबाहेर असणारी पुरूष मंडळी आपली शारीरिक भूक भागविण्यासाठी स्थानिक स्त्रियांचा पैशाच्या जोरावर वापर करू लागले. तर नवीन फॅशनच्या जगामध्ये जगण्याच्या नव्या पद्धतीमुळे आणि चंगळवादी जीवनाला बळी पडलेल्या स्त्रीयांनी देह विक्रय करायला सुरूवात केली. तर काही स्त्रियांच्या बाबत कामावरून काढून टाकल्यामुळे, नवऱ्याची नोकरी गेल्याने कारखना बंद पडला आणि चूल बंद झाल्याने काही स्त्रीयांनी हा व्यवसाय पत्करला आहे.

- **बारबाला :**

आधुनिकीकरणामुळे उद्योग, व्यवसाय व शेती उत्पादनात वाढ झाल्यामुळे सामान्य शेतकरी, कामगारापासून मालकांपर्यंत सर्वच स्तरातील लोक हॉटेलमध्ये जेवणे, बारमध्ये दारू पीत बसणे पसंत करतात. काहीजण ह्या गोष्टीला प्रतिष्ठा समजतात.याचाच फायदा बार चालकांनी घेवून झिंगलेल्या मनाला रमविण्यासाठी कमी कपड्यातील स्त्रीया बारमध्ये ठेवून आणि त्यांच्या हातून झिंगलेल्याला दारू देवून व त्याला खूष करून आपला व्यवसाय तेजीत चालू ठेवला. या बारमध्ये काम करणाऱ्या सर्वच स्त्रीया व मुली ह्या घरातील कर्जबाजारीपणामुळे,गरीबीमुळे, नवरा वारल्यामुळे बारबाला बनलेल्या दिसून येतात. ह्या मजबूर स्त्रीयांचा वापर वाईट कामासाठी होताना दिसत आहे.

- **शिक्षणक्षेत्रातील स्त्रिया :**

आज शिक्षणक्षेत्राचे खाजगीकरण होत आहे. या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या प्राचार्यापासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत काम करणाऱ्या स्त्रियांना महिन्याचा पगार नवऱ्याच्या हातात द्यावा लागतो. महिन्याला त्यांना लागणारा पैसा नवऱ्या कडून मागून घ्यावा लागतो. स्त्रिायानी स्वत: पैसा मिळवूनही तो नवाऱ्या कडून मागून घ्यावा लागतो. शिक्षण क्षेत्रामध्ये अनेक ठिकाणी, अनेक वेळा शिक्षक विद्यार्थ्यीनीचे लैगिंक शोषण करत आहेत. तर दुसरीकडे काही संस्था चालकही मुलींचे लैगिंक शोषण करत आहेत.त्यांच्या गुणवत्तेला महत्त्व देण्याऐवजी त्यांच्या शरीराला, सौंदर्याला महत्त्व दिले जात आहे. शिक्षण क्षेत्रात स्त्रियांची पिछेहाट होत असून, त्यांचा छळ होत आहे.

- **नोकरदार स्त्रिया :**

नोकरी करणऱ्या स्त्रियांना अनेक प्रकारच्या सोई, सवलती सरकारने दिल्या आहेत. जिल्हाधिकारी, सरकारी कार्यालय, बॅंका, पोलीस, आरोग्य सेवा, शिक्षण क्षेत्र, शासकीय, निमशासकीय सेवा,इ. क्षेत्रात काम करणारी स्त्री आजही पुरूष प्रधान व्यवस्थेची बळी ठरत आहे. नोकरी करणारी स्त्री सुखी नाही कारण तिचा नवरा तिच्यावर संशय घेतो, ऑफिसमधील शिपायापासून अधिकाऱ्यापर्यंत सर्वांच्या नजरा तिच्यावर रोखलेल्या असतात. आपली बायको आपल्यापेक्षा मोठ्या पदावर असलेली पुरूषांना आवडत नाही. महिन्याचा पगार नवऱ्याच्या हातात द्यावा लागतो. घरातील घरकामही तिलाच करावे. नोकरीच्या ठिकाणी स्त्रीयांना बराच त्रास सहन करावा लागतो; कारण स्त्रीयांच्यास संघटना नाही. त्या आंदोलन मोर्चा, संप करू शकत नाहीत त्या असंघटीत आहेत. म्हणून नोकरदार स्त्रीयांची नोकरीच्या ठिकाणी पिळवणूक अथवा छळ होत आहे.

- **विविध प्रसारमाध्यमातील स्त्रीया :**

विविध प्रसारमाध्यमामध्ये काम करणाऱ्या स्त्रीयांचा वापर त्या प्रमुखावर अवलंबून असतो उदा. जाहिरातीसाठी काम करणाऱ्या स्त्रीला अंगप्रदर्शन करावेच लागते कारण जागतिकीकरण हे स्पर्धेचे युग आहे या युगात ठिकाव धरायचा असेल तर जगाबरोबर जावे लागते. मग तो मार्ग आवडत नसेल, वाईट असेल तरीही तो स्विकारावाच लागतो. या जाहिरातीसाठी स्त्रीयांना भरपूर पैसा दिला जात असला तरी त्यांची विटंबना त्यातून होत असते हे मात्र खरे आहे. दुरदर्शन, विविध चॅनेल्स जाहिरातीचे विविध मार्ग, मालिका चित्रपट इ. क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रीयांना कमी लेखले जात आहे.

- **विविध क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रीया :**

वर म्हटल्याप्रमाणे विविध प्रसारमाध्यमे,क्षेत्रे ह्यामध्ये काम करणरी स्त्री आजही उपेक्षित आहे कारखाने, दवाखने, शिक्षण संस्था, शासकीय, निमशासकीय शाळा, महाविद्यालये, इंजिनिअर कॉलेज, विविध व्यवसाय, छोटे मोठे उद्योग चहा टपरी, हॉटेल्स, ब्युटीपार्लर, ऑटो रिक्शा, ड्रायव्हींग, कंडक्टर, टॅक्सी चालक, केटरर्स, स्टेषनरी, होजिअरी, शेअर मार्केट, संगणक, उद्योग व्यवस्थापन अशा विविध क्षेत्रात काम करणाऱ्या सहकारी तत्त्वामूळे व धोरणामूळे त्यांच्या उद्योग व्यवसायाना चालना मिळाली खरी पण स्त्रीत्त्वाच्या मर्यादा आल्यामूळे मार्केटिंग, बाजारातील स्पर्धा यांना स्त्री तोंड देवू शकत नाही. तसेच उत्पादित केलेला माल घरोघरी जावून लोकांपर्यंत पोहचविणे स्त्री म्हणून अशक्य असल्यामूळे त्यांच्या ड्योग, व्यवसायाची भरभराट होण्यास कालावधी लागतो काहीवेळा त्यांचे उद्योग, व्यवसाय बंदही पडतात. म्हणून काही स्त्रीया उद्योग व्यवसायाकडे न वळता अर्थार्जनासाठी त्या मॉडेलिंग,मालिकेत काम करणे जाहिरातीमध्ये काम करणे, पसंद करतात.

जागतिकीकरणाच्या प्रवाहात सापडलेल्या समाजाबरोबर स्त्रीयांचाही छळ होत आहे. आज जग इतके पुढे गेले असताना भारत मात्र फार मागे आहे कारण राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रीला मानसन्मान दिला जात नाही. गावाची सरपंच झालेल्या स्त्रीला स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिनादिवशी झेंडा फडकविण्यास मनाई केली जात आहे, उद्योग, व्यवसायात कार्यरत असणाऱ्या स्त्रीची अवस्था वरील प्रमाणे आहे. राजकारणामध्ये सक्रीय सहभागी असणाऱ्या स्त्रीयांना फक्त स्त्रीदृष्टीकोनातून वागणूक दिली जाते.अभिनय, दिग्दर्शन, लेखिका, कवयित्री, समाजसेविका उद्योजक, विविध पदाधिकारी स्त्रीया यांचा सन्मान, मान न राखता त्यांचा अपमान केला जात आहे. त्यांच्याकडे पहाण्याचा दृष्टीकोन लैगिंक शोषणाचा आहे.जागतिकीकरणामुळे तिसऱ्या जगातील गरीब, अविकसित, व अत्यल्प देशासमोरील एक गंभीर तसेच अटळ आव्हान आहे.शेतकरी, उद्योजक, व्यवसायिक, मजूर स्त्रीयांसमोर नवी आव्हाने उभी रहात आहेत.जागतिकीकरण हे नवी मूल्यव्यवस्था आणू पहात आहे. हे जरी खरे असले तरी या सर्वांचा फटका मात्र एकटया स्त्रीलाच सहन करावा लागतो कारण कारखना बंद पडला, कामगार कपात केली, कामावरून काढून टाकले अशा अन्य कारणामुळे घर सांभाळण्याची जबाबदारी एकट्या स्त्रीवरच येते.जागतिकीकरणाचे घोर परिणाम स्त्रीयांवर होत आहेत. म्हणून जागतिकीकरणाचा विचार फक्त आर्थिक क्षेत्रापुरता न करता जागतिकीकरणाचे दुष्पीणाम म्हणजे स्त्रीयांवरील अन्याय, अत्याचार यांचाही विचार केला पाहिजे. कारण स्त्रीवर समाजातील सर्वच स्तरातून जबरदस्ती, लालूच, धमकी, अपहरण, पिळवणूक, छळवणूक, गुंगी देणे, डांबून ठेवणे, बलात्कार, तिची फसवणूक करणे अशाप्रकारे छळ केला जातोच शिवाय हॉटेलात घुणीभांडी करणे, तिच्या अवयवाची विक्री करणे, शरीरविक्रय, मोलकरीन अशी कामे करावी लागतात. तिच्यावर घरात, समाजात, देशपातळीवर अत्याचार होत असतात. तिच्याबाबत खोटी अश्वासने देवून तिच्याशी लग्न करणे, तिचा लिंग भेद करणे अशा गोष्टी सर्रास चालू असतानाच तिला आश्रय देणारे,मालक, सावकार, संधीसाधू मित्र मैत्रिण, सहकारी व्यक्ती, नातेवाईक हे तिला त्रास देत असतात.स्त्रीचा व्यवहार केला जातो व्यापार केला जातो कुंटण मालकीन, गिऱ्हाईक, दलाल, पैसा पुरविणारे, सावज हेरणारे, आश्रय देणारे, विक्रते,खरेदीदार,

तिला कुंटणखान्यात भरती करणारे, तिला घेवून जाणारे लोकच तिचे खरे शत्रू आहेत. वरील सर्व गोष्टींचा विचार करता असे लक्षात येते की, स्त्रियांच्या उदरनिर्वाहाचे पर्याय नव्या अर्थव्यवस्थेत नष्ट होत आहेत. ह्या जागतिकीकरणच्या रेट्यात स्त्री फक्त राखीव कामगार होत असून स्त्री कामगारांना मोठी किंमत मोजावी लागत आहे. थोडक्यात,बडया भांडवलदार आणि देशी विदेशी औद्योगिक जगाला वाव देणारी ही व्यवस्थारोजच्या जीवनातील प्रत्येक घटकाचे वस्तूकरण करत जाते. ह्यातूनच स्त्री—पुरूष विषमता वाढत जात आहे याचे दुशपरिणाम समाजातील स्त्रीवर्गावर होत आहेत दिवसेंदिवस पुरूषी वर्चस्व वाढत जावून तिच्यावर अन्याय, अत्याचार व बलात्काराचे प्रमाण वाढत आहे. स्त्री उद्योजक, नोकरी करणारी, उत्तम गृहीणी, असली तरी तिच्यावर होणारे अन्याय, नव्या जगातील पुढील आकडेवारीवरून लक्षात येतात.हुंड्याची हत्या—१९४, हत्येचा प्रयत्न—१०७, हुंडाबळी—३२९, बलात्कार—१२४३, अपहरण—११४०, सासूरवास—७४१५, विनयभंग—३९३५, लैंगिक छळ—१२९४ अशी ताजी आकडेवारी सांगते आहे. यामध्ये सर्व स्तरातील स्त्रीयांचा समावेश होत आहे. आर्थिक क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने जाणारी स्त्री मात्र जागतिकीकरणाच्या रेट्यात दबली जात आहे. आजच्या या वर्तमानामध्ये तिला एक गृहीणी, पत्नी, परितक्त्या इतकेच महत्त्व उरले आहे.

- **संदर्भ**

१) डॉ. गोटे शुभांगी,— संपा —स्त्री परिवर्तनाची आव्हाने दृ डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, श्रीमती काशीबाई अण्णाराव गऊळकर स्मृती व्याखानमालेतील काही व्याख्याने

२) दातार छाया, तांबे श्रुती . संपा— अस्तित्व संघर्ष आणि सार्वभौमत्व— स्त्री अभ्यासासमोरील आव्हाने ८व्या भारतीय स्त्री अभ्यास परिशदेतील काही निबंध,

३) कुलकर्णी प्रसाद संपा— प्रबोधन प्रकाश ज्योती जाने.२००३,मार्च.२००४,मे.२००४, जुलै २००४, ऑगस्ट २००४.

४) प्रा. भोसले. के. एम., प्रा. काटे के .बी.—भारतीय अर्थव्यवस्था—फडके प्रकाशन, कोल्हापूर प्रथमावृती सप्टे—२००४.

५) नानिवडेकर मेघा संपा— महाराष्ट्रातील स्त्री चळवळीचा मागोवा, प्रतिमा प्रकाशन पुणे, प्रथमावृती २००६.